# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०२/१८
## दि.०६/०२/१८ रोजी दु.१२/०० वा.ते २०/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ७५/१८,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | सौ.बिंदु सहाणी,वय ३२ वर्षे,रा.जांबे,ता.मुळशी,जि.पुणे |
| **आरोपी** | १)करण राजु गायकवड,वय २३ वर्षे,रा.संदीप पवार विटभट्टी, जांभे ता.मुळशी,जि.पुणे मुळ रा.नांदेड २)अमोल बबन धिंडे,वय १९ वर्षे,रा.सदर मुळ रा.जालना ३)मारुती उर्फ बापु रघुनाथ पवार,वय २७ वर्षे,रा.सदर मुळ रा.नाशिक (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०२/२०१८ रोजी २०/१५ वा.चे सुमारास नेरे फाटा जांबे सार्वजनिक रोडवर ता.मुळशी जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणी माळीकाम करीत असुन, त्यांचे पती अजय शिवपुरण उर्फ जयराम सहाणी,वय ३५ वर्षे,रा.तुकाराम गायकवाड चाळ, मु.पो.जांभे,ता.मुळशी,जि.पुणे हे पुनावळे येथे एका कंपनीत सफाई सेवक म्हणुन नोकरीस होते. सुमारे तीन महिन्यापुर्वी त्यांचे चाळीत राहणारा करण गायकवाड याने फिर्यादी यांचे पती कामवारुन आल्यावर बाहेर बसुन त्याची आई भांडी घासत असताना तिचेकडे पाहतात कारणावरुन त्यांचेशी भांडणे केली होती. याकारणावरुन त्यांचेत वारंवार भांडणे झाल्याने करण गायकवाड यास घरमालकाने खोली खाली करण्यास लावली होती. या कारणावरुन वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे पती अजय शिवपुरण हे कामावरुन घरी येत असताना, यातील नमुद इसम यांनी गैरसमज करुन घेवुन फिर्यादी यांचे पतीला लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करुन, जखमी करुन, जिवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.पी.सोनवणे ८८०५३७३७३९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ८९/१८,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | श्रीमती सुमन गायकवाड,वय ४० वर्षे,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०२/२०१८ रोजी रात्रौ १०/०० वा.ते दि.०६/०२/२०१८ रोजी पहाटे ०४/०० वा.चे दरम्यान बिल्डींग नं.१ टीसीआय कंपनी समोर, अजंठानगर, चिंचवड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांनी त्यांची दुचाकी गाडी व तसेच लता मोहन खरचणे यांनी त्यांची ड्रिम योगा गाडी व एक ॲटलस कंपनीची रेंजर सायकल तसेच भाऊसाहेब सुर्यभान ठोसर यांची हिरो होंडा मोटार सायकल हया लॉक करुन पार्क करुन ठेवल्या असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी व त्यांचे शेजारी यांच्या गाडया जाळुन नुकसान होईल हे माहित असताना सुध्दा सर्व गाडयांना आग लावुन, फिर्याद व त्यांचे शेजारी यांच्या गाडयांचे एकुण ८८ हजार रु.चे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस. सुर्यवंशी ९७६७८५११०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**